# राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना

विद्यार्थ्यांच्या अपघातामुळे पोहोचलेल्या छतीची काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना सुरक्षा कवच देण्याकरीता राज्यातील इयत्ता 1 ली पासून उच्च शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना राजीव गांधी अपघात योजना सुरु करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांचे अपघातामध्ये निधन झाल्यास त्याच्या कुटूंबियास सानुग्रहाची रक्कम पुढील प्राथम्यानुसार देय आहे.

अ) विद्यार्थ्यांची आई,
ब) विद्यार्थ्यांची आई हयात नसल्यास वडील,
विद्यार्थ्यांची आई-वडील हयात नसल्यास, 18 वर्षावरील भाऊ किंवा बहीण किंवा पालक.

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत मिळणारे लाभ.

1. विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास रु. 75,000/-
2. अपघातामुळे कायमचे अंपगत्व (2 अवयव/ दोन डोळे किंवा 1 अवयव व 1 डोळा निकामी) झाल्यास रु. 50,000/-
3. अपघातामुळे अपंगत्वामध्ये 1 अवयव किंवा 1 डोहा निकामी झाल्यास रु. 30,000/-

अर्जाचा नमुना, सोबत जोडावयाची कागदपत्रे बाबत संपूर्ण माहिती शालेय व शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय दिनांक 11 जुलै, 2011 व 1 ऑक्टोबर, 2013 मध्ये नमूद आहे.

वरील प्रमाणे नुकसान भरपाई देण्याची तरतुद असून ही योजना शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालयाकडून राबविण्यात येते.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया